ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २३८ • शुक्रवार दि.१९ जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## दगाफटक्याचे राजकारण सहन केले जाणार नाही

### आदित्य ठाकरेंचा बंडखोर व सत्ताधाऱ्यांवर घणाघात



मुंबई/प्रतिनिधी-मागच्या निवडणुकीत शिवसेनेच्या बळावर निवडून आलेल्या काही खासदारांनी व्यक्तीगत स्वार्थासाठी दगाफटका केला. असे हे घाणेरडे राजकारण महाराष्ट्र सहन करणार नाही अशा शब्दात शिवसेना नेते आ. आदित्य ठाकरे यांनी बंडखोर आणि सत्ताधाऱ्यांवर घणाघात केला. सहा खासदारांच्या बंडखोरीनंतर पहिल्यांदाच आदित्य ठाकरे यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

शिवसेना (ठाकरे गट)तील खासदारांच्या फुटीनंतर युवा नेते आदित्य ठाकरे यांनी आक्रमक भूमिका घेत बंडखोर खासदारांवर जोरदार हल्लाबोल केला. २०२४ मध्ये पक्षाच्या बळावर निवडून आलेल्या काही जणांनी स्वार्थासाठी दगाफटका केल्याचा आरोप करत, तुम्ही स्वतःला निर्लज्जपणे विकले आहे. त्यासोबतच तुमची प्रतिष्ठा, तुमचे नाव आणि कुटुंबाचे नावही पणाला लावले आहे, अशा शब्दांत त्यांनी संताप व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सातत्याने कार्यकर्त्यांमध्ये फिरतात, तर उद्धव ठाकरे यांना आरोग्याच्या कारणांमुळे सक्रिय राहणे शक्य नसल्याने आदित्य ठाकरे यांनी अधिक सक्रिय असायला हवे होते, असे वक्तव्य खा.ओमराजे निंबाळकर यांनी केले होते. या पार्श्वभूमीवर आदित्य ठाकरे यांनी सोशल मीडियावरून प्रत्युत्तर देत पक्ष सोडण्यासाठी विविध कारणे देणाऱ्या खासदारांना लक्ष्य केले.आज शिवसेनेचा ६० वा वर्धापन दिन आहे. अशा वेळी पुन्हा एकदा घाणेरड्या राजकारणाचे विदारक उदाहरण महाराष्ट्रासमोर आले आहे. एहसान फरामोश आणि विकाऊ वृत्तीच्या काही व्यक्तींनी ज्यांच्यामुळे निवडून आले, त्यांनाच दगा दिला आहे.कितीही पान ४ वर

### खासदार फुटीनंतर उद्धव ठाकरेंचा संघर्षाचा निर्धार

मुंबई/प्रतिनिधी-शिवसेनेतील काही खासदारांनी स्वतंत्र भूमिका घेतल्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सोशल मीडियावरील पोस्टद्वारे कार्यकर्ते आणि समर्थकांना संघर्षाचा संदेश दिला आहे. शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येला त्यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो शेअर करत कविवर्य कुसुमाग्रज यांच्या काव्यपंक्तींच्या माध्यमातून प्रतिकूल परिस्थितीतही नव्या उमेदीने उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

## गोल्डन जर्दा स्टोअर्सवर एफडीएची धाड;नऊ लाखाचा गुटखा जप्त



नांदेड/प्रतिनिधी-अन्न व औषध प्रशासन, आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशान्वये गुटखा-पानमसाला या प्रतिबंधित खाद्य पदार्थाची नांदेड शहरात तपासणी सुरु आहे. इतवारा भागातील मे. गोल्डन जर्दा स्टोअर्सवर अन्न औषध प्रशासन विभागाच्या पथकाने गुरुवारी धाड टाकुन ९ लाख ८६ हजार रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला आहे.

इतवारा भागातील गोल्डन जर्दा स्टोअर्समधून शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा किरकोळ विक्रेत्यांना पुरवठा केला जात असल्याची माहिती अन्न औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळाली. गुरुवार दि.१८ जून रोजी अन्न औषध प्रशासन विभागाच्या पथकाने पोलीसांना सोबत घेवून मे.गोल्डन जर्दा स्टोअर्सवर धाड टाकली. सदर धाडीमध्ये एकूण ३४ प्रकारच्या प्रतिबंधित खाद्यपदार्थाचा साठा ज्यामध्ये रजनीगंधा पानमसाला, विमल पानमसाला, राजनिवास सुगंधीत पानमसाला, सागर पानमसाला, मुसाफीस पानमसाला, गोवा १०००, आरएमडी पानमसाला, व्हीवन चेविंग टोबॅको, मिराज जाफरानी जर्दा, वजीर गुटखा, एम सेटेंड टोबॅको, सिंगनिचर पानमसाला इत्यादि ९ लाख ८६ हजार ०१७ रूपये एवढया किंमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला. विक्रेता व पुरवठादार अशा एकूण व्यक्तींविरूध्द इतवारा पोलीस स्टेशन, नांदेड येथे प्रथम खबरी अहवाल क्रमांक ०२०९/२०२६ दि. १९ जून नोंदविण्यात आला असून सदरील पेढी सिल करण्यात आलेली असून पुढील तपास इतवारा पोलीसांमार्फत करण्यात येत आहे. सदर कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी अमृता दुधाटे, अरूण तम्मडवार, अ. नं. गिरी, शिल्पा श्रीरामे, तुषार घोपे, कृष्णा मुळे व वैभव ढोंबरे यांनी केली आहे. अन्न औषध प्रशासन विभागाच्या धाडीमुळे गुटखा माफियांमध्ये खळबळ उडाली आहे.

## मराठा आरक्षणासाठी २९ ऑगस्टपासून उपोषण

### अंमलबजावणीत हलगर्जीपणा मनोज जरांगे पाटलांची टीका

जालना:राज्यातील मराठा आरक्षणाच्या आंदोलनाची धग पुन्हा एकदा वाढण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांनी महायुती सरकारवर तीव्र टीका करत २९ ऑगस्ट २०२६ पासून पुन्हा बेमुदत उपोषणाला बसण्याची घोषणा केली आहे. आंदोलनाचा तिसरा वर्धापनदिन असलेल्या या दिवशी नव्या टप्प्यातील लढ्याची सुरुवात करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी भाजपचे आमदार प्रसाद लाड तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

सरकारला मला राजकीय बळीचा बकरा बनवायचे असेल तर त्यासाठीही मी तयार आहे, असे स्पष्ट शब्दांत सांगत जरांगे पाटील यांनी सरकारवर



दिलेल्या आश्वासनांच्या अंमलबजावणीत हलगर्जीपणा झाल्याचा आरोप केला. गेल्या मे महिन्यातील आंदोलनानंतर सरकारने मराठा समाजाला ओबीसींप्रमाणे सवलती देण्याचा शासन निर्णय काढला, कुणबी प्रमाणपत्र वाटपाची प्रक्रिया सुरू केली तसेच आंदोलनादरम्यान मृत्यू झालेल्या कुटुंबांना आर्थिक मदत व एमआयडीसीमध्ये नोकऱ्यांचे आश्वासन दिले होते. मात्र, प्रशासकीय पातळीवर अडथळे निर्माण करण्यात आल्याने या निर्णयांचा अपेक्षित लाभ समाजाला मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला.कराड येथे कुणबी समाजाशी संबंधित सुमारे हजार ऐतिहासिक नोंदी उपलब्ध असूनही त्या जाणीवपूर्वक रोखून धरल्या जात असल्याचा दावा जरांगे पाटील यांनी केला. लातूर जिल्ह्यातील चाकूरसह मराठवाड्यातील विविध भागांतही अशीच परिस्थिती असल्याचे त्यांनी सांगितले. मोडी पान ४ वर




सोनखेड येथील पेट्रोलपंपावर प्लंबरचे काम करणाऱ्या किफायत अली याचा खून करण्यात आला आहे. मयताच्या कुटुंबियाला एमआयएमच्यावतीने अडीच लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. यावेळी एमआयएमचे माजी प्रदेशाध्यक्ष सय्यद मोईन, फेरोज लाला, महापालिकेचे विरोधी पक्षनेते मसूद खान, सय्यद मुजीब, नगरसेवक लतीफ लोखंडवाला, सय्यद फसीयोद्दीन, अल्ताफ हुसेन, हाफीज बागवान, रहीमखान व इतर उपस्थित होते. (छाया : करणसिंह बैस)

## इंधन दरात तातडीने कपात नाहीच

### केंद्रीय राज्यमंत्री सुरेश गोपी यांची माहिती

नवी दिल्ली:आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत घट झाल्यानंतर देशातील पेट्रोल, डिझेल आणि एलपीजी गॅसच्या दरात तातडीने कपात होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र, ग्राहकांना सध्या तरी कोणताही दिलासा मिळण्याची शक्यता नसल्याचे स्पष्ट झाले आहे. कच्च्या तेलाच्या दरात घसरण झाली असली तरी त्याचा थेट फायदा भारतीय ग्राहकांना लगेच मिळणार नसल्याची माहिती केंद्रीय पेट्रोलियम, नैसर्गिक वायू आणि पर्यटन राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी दिली आहे.

अमेरिका-इराण संघर्ष संपुष्टात आल्यानंतर होर्मुज सामुद्रधुनीतून पुन्हा व्यापारी जहाजांची वाहतूक सुरू झाली आहे. त्यामुळे कच्चे तेल आणि एलपीजी गॅसच्या पुरवठ्याचा मार्ग मोकळा झाला असून आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमतीही खाली आल्या आहेत. युद्धामुळे काही काळ कच्च्या तेलाच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्याने त्याचा परिणाम भारतातील इंधनदरांवर झाला होता. पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या किमती वाढविण्यात आल्याने सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक भार पडला होता.दरम्यान, जागतिक बाजारात तेल स्वस्त झाले असले तरी त्या दरातील कच्चे तेल भारतात पोहोचण्यासाठी काही कालावधी लागणार असल्याचे सुरेश गोपी यांनी सांगितले. त्यामुळे देशातील इंधनदरात तातडीने कपात करणे शक्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.अलीकडेच पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर सुमारे ३.९४ रुपयांची वाढ करण्यात आली होती. युद्धकाळात वाढलेल्या कच्च्या तेलाच्या किमतींचा मोठा फटका सार्वजनिक क्षेत्रातील पेट्रोलियम कँपन्यांना बसला असून, नागरिकांवरील भार मर्यादित ठेवण्यासाठी केंद्र सरकारने हस्तक्षेप केल्यामुळे सुमारे १२ हजार कोटी रुपयांचा आर्थिक भार सहन करावा लागल्याचेही त्यांनी नमूद केले.

## ऑपरेशन फ्लश आऊटचा दणका;पोलिसांची धडाकेबाज कारवाई

### जबरी चोरीचे दोन गुन्हे उघड,सात आरोपी जेरबंद,५ लाखांचा मुद्देमाल जप्त

नायगाव/प्रतिनिधी-जिल्ह्यातील जबरी चोरी व लुटमारीच्या गुन्ह्यांवर अंकुश ठेवण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत रामतीर्थ व भाग्यनगर पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी करत दोन जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. या कारवाईत एकूण सात आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडून ५ लाख १५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनि विक्रम हराळे यांनी दिलेल्या माहितीनूसार रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका व्यक्तीस धमकावून मोबाईल व रोख रक्कम लुटल्याप्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेला मोबाईल फोन तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेला खंजर जप्त करण्यात आला. तर भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्कुटी जबरदस्तीने हिसकावून नेल्याच्या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी चार आरोपी व एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर चोरीस गेलेली स्कुटी आणि गुन्ह्यात वापरण्यात आलेली स्विफ्ट कार जप्त करण्यात आली.पोलीस अधीक्षक अभिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली रामतीर्थचे



सपोनि विक्रम हराळे तसेच भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली. गुन्ह्यांचा छडा लावून आरोपींना जेरबंद करण्यात यश मिळवल्याबद्दल पोलीस अधीक्षकांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील गुन्हेगारांमध्ये खळबळ उडाली असून पोलिसांचा वाढता धाक पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

## राजवाडी शिवारात बिबट्याने शेळीचा फडशा पाडला

मुदखेड/प्रतिनिधी-मुदखेड तालुक्यातील मौजे राजवाडी येथे बिबट्याच्या हल्ल्यात शेतकऱ्याची शेळी ठार झाल्याची घटना काल मध्यरात्री घडली असून, त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेत शेतकरी कपिल पांडुरंग जोंधळे यांचे अंदाजे १५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कपिल जोंधळे यांच्या शेतातील आखाड्यावर बांधून ठेवलेल्या शेळीला मध्यरात्रीच्या सुमारास बिबट्याने ओढून नेले. काही अंतरावर नेऊन तिचा फडशा पाडल्याचे निदर्शनास आले. या प्रकारामुळे शेतकरी कुटुंबासह परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. घटनेची माहिती वन विभागाला देण्यात आली. नुकसान भरपाईसाठी ऑनलाईन प्रक्रिया करण्याचे वन विभागाकडून सांगण्यात आले. मात्र, संबंधित संकेतस्थळ सध्या कार्यरत नसल्याने शेतकऱ्याला अर्ज दाखल करण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकरी हवालदिल झाला आहे.दरम्यान, राजवाडी परिसरात बिबट्याचा वाढता वावर लक्षात घेता वन विभागाने तातडीने उपाययोजना करून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# शांततेचा श्वास; जगाला दिलासा

मध्यपूर्वेत गेल्या साडेतीन महिन्यांपासून धुमसत असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर अखेर शांततेचा करार झाल्याची घोषणा जगासाठी मोठा दिलासा ठरली आहे. अमेरिका, इराण आणि इस्रायल यांच्यातील संघर्षाने केवळ त्या प्रदेशालाच नव्हे तर संपूर्ण जगाला अस्थिरतेच्या गर्तेत ढकलले होते. युद्धाच्या छायेमुळे जागतिक अर्थव्यवस्था हादरली, इंधनाच्या किमती गगनाला भिडल्या, महागाईने अनेक देशांतील सर्वसामान्य नागरिकांचे कँबरडे मोडले आणि जागतिक व्यापारावरही गंभीर परिणाम झाला. अशा परिस्थितीत झालेला शांतता करार हा केवळ युद्धविराम नसून जागतिक स्थैर्याकडे टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल मानावे लागेल.मध्यपूर्व हा जगातील खनिज तेलाचा प्रमुख स्रोत मानला जातो. या भागात निर्माण होणाऱ्या कोणत्याही तणावाचा थेट परिणाम तेलाच्या उत्पादनावर आणि पुरवठ्यावर होत असतो. गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या युद्धामुळे अनेक तेल उत्पादक क्षेत्रांतील कामकाजावर परिणाम झाला. समुद्री मार्गांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला. परिणामी जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती झपाट्याने वाढल्या. भारतासह अनेक विकसनशील देशांना याचा मोठा फटका बसला. पेट्रोल, डिझेल, गॅस यांचे दर वाढल्याने वाहतूक खर्च वाढला आणि त्याचे पडसाद सर्वच वस्तूंच्या किमतींवर उमटले. महागाई ही कोणत्याही देशासाठी मोठी आर्थिक समस्या असते. युद्धामुळे निर्माण झालेल्या इंधन टंचाईने अनेक राष्ट्रांमध्ये महागाईचा आगडोंब उसळला. अन्न धान्य, औषधे, बांधकाम साहित्य, वाहतूक सेवा यांसह दैनंदिन जीवनातील जवळपास प्रत्येक क्षेत्रावर त्याचा परिणाम झाला. आधीच आर्थिक अडचणींना सामोरे जाणाऱ्या गरीब व मध्यमवर्गीय नागरिकांचे जीवन अधिक कठीण झाले. अनेक देशांच्या सरकारांना महागाई नियंत्रणासाठी विशेष उपाययोजना कराव्या लागल्या. युद्धाचा परिणाम केवळ अर्थकारणापुरता मर्यादित राहिला नाही. हजारो नागरिकांना आपली घरे सोडावी लागली. अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली. निरपराध नागरिकांचा जीव गेला. युद्धाच्या भयावहतेमुळे शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक जीवनावर गंभीर परिणाम झाला. मानवतेच्या दृष्टीने ही मोठी शोकांतिका होती. आधुनिक जगात संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून प्रश्न सोडविण्याचे मार्ग उपलब्ध असताना युद्धाचा पर्याय निवडला जाणे ही चिंतेची बाब आहे.शांतता करारामुळे आता या प्रदेशात स्थैर्य निर्माण होण्याची आशा वाढली आहे. तेल उत्पादन आणि पुरवठा पूर्वपदावर येण्यास मदत होईल. जागतिक बाजारपेठेतील अनिश्चितता कमी होईल. इंधनाच्या किमती स्थिर राहिल्यास महागाईवर नियंत्रण मिळविण्यास विविध देशांना मदत होऊ शकते. व्यापार, उद्योग आणि गुंतवणूक क्षेत्रातही सकारात्मक वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे.मात्र, केवळ करार झाला म्हणून सर्व प्रश्न सुटले असे मानता येणार नाही. युद्धामागील राजकीय, आर्थिक आणि सामरिक कारणांचा गांभीर्याने विचार करावा लागेल. संबंधित राष्ट्रांनी परस्पर विश्वास वाढविणे, संवाद कायम ठेवणे आणि मतभेदांचे शांततापूर्ण मार्गाने निराकरण करणे आवश्यक आहे. अन्यथा शांततेचे हे वातावरण तात्पुरते ठरण्याचा धोका नाकारता येणार नाही.जागतिक समुदायानेही या अनुभवातून धडा घेण्याची गरज आहे. युद्धातून कोणाचाही कायमस्वरूपी फायदा होत नाही. उलट मानवी जीवितहानी, आर्थिक नुकसान आणि सामाजिक अस्थिरता यांची मोठी किंमत मोजावी लागते. त्यामुळे संघर्षाऐवजी सहकार्य, संवाद आणि शांततामय सहअस्तित्व यांना प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. अमेरिका, इराण आणि इस्रायल यांच्यात झालेला शांतता करार हा जगासाठी आशेचा किरण ठरला आहे. युद्धाच्या धगधगत्या वातावरणातून बाहेर पडून शांततेच्या मार्गावर चालण्याचा हा निर्णय स्वागतार्ह आहे. आता या कराराचे प्रामाणिकपणे पालन होऊन मध्यपूर्वेत दीर्घकालीन स्थैर्य निर्माण व्हावे आणि जगाला पुन्हा एकदा युद्धाच्या भीषण सावटाला सामोरे जावे लागू नये, हीच सर्वांची अपेक्षा आहे.

# आत्मपरीक्षणाची गरजःसंपत्ती, पदे आणि दिखाऊ समाजसेवेच्या पलीकडे

आजकाल एक वेगळे चित्र समाजात दिसून येत आहे. अनेक जण काही काळ विश्रांती घेतल्यानंतर पुन्हा धार्मिक कार्य, दानधर्म, भजन, कीर्तन आणि विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय होताना दिसतात. हे स्वागतार्ह असले, तरी त्यामागील उद्देश काय आहे, याचाही विचार व्हायला हवा. आयुष्याच्या उत्तरार्धात माणसाला अखेर हे समजू लागते की पैसा, संपत्ती, पदे आणि प्रतिष्ठा हे सर्व क्षणभंगुर आहे. मोठमोठे नेते, उद्योगपती, समाजकारणी आणि सत्ताधारी या जगातून निघून गेले. त्यांच्या हाती काहीच राहिले नाही. तरीही आपण मात्र इकडून तिकडे, तिकडून इकडे उड्या मारत राहिलो. पक्ष बदलले, भूमिका बदलल्या, विचार बदलले; पण आत्मपरीक्षण करण्याची वेळ मात्र कधीच आली नाही.




कर्माचा खेळ मोठा विलक्षण असतो. कालपर्यंत ज्यांच्या नावाने जयजयकार होत होता, त्यांची आज आठवण काढणारेही फारसे उरलेले नाहीत. कोणता राजकीय पुढारी खऱ्या अर्थाने सुखी आहे? बाहेरून प्रत्येक जण समाजसेवक असल्याचे भासवतो, परंतु आतून प्रत्येक जण विविध समस्यांनी ग्रासलेला आहे. अनेकांनी शैक्षणिक संस्था, उद्योग, व्यापार, भूखंड, दुकाने, कँम्पन्या उभ्या केल्या. परंतु शेवटी स्मशानातील जागा कुणाची असते? ती सर्वांचीच असते. तिथे जात, धर्म, पक्ष, पद किँवा संपत्ती यांना काहीही महत्त्व राहत नाही.आपण कितीही मोठे झालो, तरी मृत्यूचे भय प्रत्येकाला असते. म्हणूनच आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात अनेक जण पुन्हा देवधर्म, कीर्तन, वारकरी संप्रदाय किँवा समाजसेवेच्या माध्यमातून स्वतःचे स्थान शोधण्याचा प्रयत्न करतात. परंतु प्रश्न असा आहे की, या सर्वातून समाजाला नेमके काय मिळाले? एखाद्या गरीबाला आधार मिळाला का? एखाद्या गरजू कुटुंबाला हातभार लागला का? की सर्व काही केवळ प्रसिद्धी, फोटो आणि प्रतिष्ठेसाठीच होते? आज प्रत्येक समाजात, प्रत्येक जातीमध्ये जातीय नेते निर्माण झाले आहेत. त्यांना खतपाणी घालण्यासाठी कधी देव-धर्माचा वापर केला जातो, तर कधी राष्ट्रपुरुषांच्या नावाचा आधार घेतला जातो. कालपर्यंत ज्या व्यक्तींची छायाचित्रे घराघरात लावली जात होती, त्यांची जागा आज नवीन व्यक्तींनी घेतली आहे. सोशल मीडियावरील डीपी बदलतात, घोषणाबाजी बदलते; पण समाजाचे प्रश्न मात्र तसेच राहतात.जात, धर्म, पंचायती, संघटना आणि विविध गट यांच्या माध्यमातून समाज विभागला जात आहे. परंतु इतिहास सांगतो की, मोठमोठी साम्राज्ये नष्ट झाली, किल्ले ढासळले, पर्वतांचे कडे कोसळले, राजे-महाराजे गेले; पण त्यांची कर्तृत्वगाथा आजही लोकांच्या स्मरणात आहे. प्रश्न असा आहे की, आपण त्यांच्या विचारांचा किती आदर करतो? राजमाता जिजाऊंनी घडवलेले छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्याची शपथ घेऊन हिंदवी स्वराज्य निर्माण करणारे ते महान राजे आज असते, तर त्यांना आपल्या समाजाकडे पाहून काय वाटले असते? धर्म आणि स्वाभिमानासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांना आपण कोणत्या तोंडाने स्मरतो? त्यांनी धर्म सोडला नाही, स्वाभिमान सोडला नाही. अमानुष छळ सहन करूनही त्यांनी तत्त्वांशी तडजोड केली नाही. मृत्यू समोर उभा असतानाही ते अटल राहिले. म्हणूनच ते आजही जनतेच्या हृदयात देवासमान स्थान मिळवून आहेत.आज आपण सुखात जगत आहोत, ऐश्वर्याचा उपभोग घेत आहोत, पण हे सर्व त्या महान व्यक्तींच्या त्यागामुळेच शक्य झाले आहे. दुर्दैवाने, आपण वर्षातून एकदा जयंती आणि पुण्यतिथी साजऱ्या करतो, थोडासा दानधर्म करतो, मोठमोठे फोटो लावतो आणि स्वतःला त्यांचे अनुयायी म्हणवून घेतो. पण त्यांच्या विचारांचे आचरण मात्र आपल्या जीवनात दिसत नाही.



**दत्तोपंत डहाळे**
नांदेड.

राष्ट्रगीत आपल्याला पूर्ण येते का? संविधानाची मूलभूत तत्त्वे आपल्याला माहिती आहेत का? कायद्याचे ज्ञान आहे का? याचा विचार करण्याऐवजी अनेक जण सतत दिल्ली-मुंबईच्या फेऱ्या मारण्यात आणि मोठ्या लोकांच्या जवळ राहण्यातच धन्यता मानतात. स्वतःवर आणि स्वतःच्या कर्मावर विश्वास नसल्यामुळेच माणूस सतत दुसऱ्यांच्या मागे फिरत राहतो.काही जण तर अशा व्यक्तींना जवळ ठेवतात ज्यांच्यावर अनेक गुन्हे दाखल आहेत, ज्यांच्यामुळे समाजात अराजकता निर्माण होते. अशा प्रवृत्तींपासून समाजाला धोका निर्माण होतो. म्हणूनच प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे- आपले वय किती झाले? आपण काय करत आहोत? आणि जे करत आहोत ते समाजहिताचे आहे का? आपल्या पूर्वजांनी किती संपत्ती कमावली, किती जमीन-जुमला सोडून गेले, हे पाहण्यात आपण वेळ घालवतो; पण त्यांनी मागे ठेवलेले विचार, संस्कार आणि मूल्ये समजून घेण्याचा प्रयत्न करीत नाही. हेच खरे दुर्दैव आहे.

आज गरज आहे ती गड-किल्ल्यांचे संवर्धन करण्याची. प्रत्येक राजकीय नेत्याने एक-दोन किल्ले दत्तक घ्यावेत, त्यांच्या जतनासाठी निधी द्यावा, त्यांचा इतिहास पुढील पिढीपर्यंत पोहोचवावा. भगवा केवळ हातात घेऊन चालणार नाही, तर त्यामागील शौर्य, त्याग आणि राष्ट्रभक्तीही आचरणात आणावी लागेल.डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आणि स्वातंत्र्यासाठी बलिदान देणारे सर्व राष्ट्रपुरुष हे आपल्या समाजाचे खरे दैवत आहेत. त्यांना विसरून चालणार नाही. त्यांच्या विचारांमुळेच आपण आज उभे आहोत, शिक्षित झालो आहोत आणि प्रगतीचा मार्ग स्वीकारला आहे.म्हणूनच प्रत्येकाने आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. आपण काय करतो, कसे जगतो, समाजासाठी काय देतो आणि आपल्या अस्तित्वाचा खरा अर्थ काय आहे, याचा विचार केला पाहिजे. कारण शेवटी पद, पैसा आणि प्रतिष्ठा यापेक्षा माणुसकी, प्रेम, जिव्हाळा आणि आपुलकी यांचीच खरी किँमत असते.

आज जग वेगाने बदलत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान आणि ज्ञानाच्या क्षेत्रात नवनवीन क्रांती घडत आहेत. आपण मात्र अजूनही व्यक्तिपूजा, गटबाजी आणि अहंकारात अडकून राहिलो आहोत. आता वेळ आली आहे ती माणसे जोडण्याची, प्रेम आणि विश्वासाची नाती निर्माण करण्याची.आयुष्य फार थोडे उरले आहे. अनेक जण हृदयरोग, मधुमेह, रक्तदाब आणि विविध आजारांनी त्रस्त आहेत. प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या दुःखात जगत आहे. त्यामुळे उरलेल्या आयुष्यात वैर, द्वेष आणि स्पर्धा न करता समाजासाठी काहीतरी चांगले करण्याचा संकल्प करणे, हाच खरा धर्म आहे. आत्मपरीक्षण केल्यावरच माणसाला स्वतःची खरी ओळख पटते. आणि जेव्हा माणूस स्वतःला ओळखतो, तेव्हाच तो खऱ्या अर्थाने समाजासाठी आणि राष्ट्रासाठी उपयुक्त ठरतो.



यावर्षी अनेक भागांमध्ये जांभूळ (Syzygium cumini) वृक्षांना मोठ्या प्रमाणावर फळधारणा झाल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण भागात अशी एक समजूत प्रचलित आहे की, जांभळाला भरपूर फळे आली तर पुढील वर्षी दुष्काळ पडतो. मात्र, या समजुतीकडे

# जांभूळ फळांनी लगडले;पण दुष्काळाचा ठोस पुरावा नाही

## निसर्गाचे संकेत समजून घेताना विज्ञानाची साथ आवश्यक

वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे.

वनस्पतीशास्त्रानुसार जांभूळासारख्या बहुवर्षायू वृक्षांमध्ये काही वर्षे मोठ्या प्रमाणात फळधारणा (Mast Fruiting किंवा Bumper Fruiting) आढळून येते. यामागे अनेक पर्यावरणीय घटक कारणीभूत असतात. मागील वर्षातील पर्जन्यमान, तापमानातील बदल, परागणाची यशस्विता, तसेच झाडामध्ये साठवलेली अन्नद्रव्ये या घटकांमुळे एखाद्या वर्षी फळधारणा अधिक प्रमाणात होऊ शकते. जांभळाला भरपूर फळे येणे म्हणजे निश्चितपणे दुष्काळ पडणारच, असे कोणतेही वैज्ञानिक संशोधन किँवा पुरावे उपलब्ध नाहीत. त्यामुळे या दोन घटनांमध्ये थेट कारण-परिणाम संबंध असल्याचे म्हणता येत नाही. काही ठिकाणी Suicide Fruiting किंवा Survival of the Species या संकल्पनांचा उल्लेख केला जातो. परंतु या संज्ञा प्रामुख्याने एकवर्षायू (Annual) वनस्पतींसाठी वापरल्या जातात. जांभूळासारख्या दीर्घायुषी बहुवर्षायू वृक्षांसाठी त्यांचा वापर सामान्यतः केला जात नाही. जर ही संकल्पना सर्वत्र लागू होत असेल, तर सर्वच वृक्षांमध्ये दुष्काळापूर्वी मोठ्या प्रमाणात फळधारणा दिसायला हवी; परंतु प्रत्यक्षात तसे आढळून येत नाही. तथापि, आपल्या पूर्वजांनी निसर्गाचे अत्यंत बारकाईने निरीक्षण केले होते. त्यांच्या अनुभवांवर आधारित अनेक पारंपरिक ज्ञानप्रणाली आजही महत्त्वाच्या मानल्या जातात. अशा अनुभवांमधून काढलेली काही अनुमाने काही वेळा अंशतः खरी ठरू शकतात. त्यामुळे पारंपरिक ज्ञान पूर्णपणे नाकारता येत नाही; मात्र त्याची वैज्ञानिक पडताळणी करणेही तितकेच आवश्यक आहे. यावर्षी हवामानतज्ज्ञांनी एल नीनो प्रभाव तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. एल नीनोमुळे भारतातील मान्सूनवर प्रतिकूल परिणाम होऊन पर्जन्यमान कमी होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे यंदा काही भागांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र, त्याचा आणि जांभळाच्या फळधारणेचा थेट संबंध असल्याचे निश्चितपणे सांगता येणार नाही. निसर्गातील घटना समजून घेताना पारंपरिक अनुभव आणि आधुनिक विज्ञान यांचा समतोल साधणे हेच अधिक योग्य ठरेल.

**डॉ.विशाल मराठे**
सायन्स कॉलेज,नांदेड

# नीट (युजी) २०२६ प्रवेश परिक्षार्थींची होणार वैद्यकीय तपासणी

नांदेड/प्रतिनिधी-नीट (युजी)-२०२६ प्रवेश परीक्षा काळात प्रतिबंधित वस्तूच्या वापरांवर प्रशासनाचे कडक लक्ष असून, इलेक्ट्रॉनिक, ब्लूटूथ वापर बंदी करण्यासाठी परीक्षार्थींची वैद्यकीय तपासणी होणार आहे. जर परीक्षा केंद्रावर प्रतिबंधीत करण्यात आलेल्या वस्तू परीक्षार्थीकडे आढळून आल्यास तो अनुचित साधनांचा वापर मानला जाईल. नियमानुसार व कायद्यानुसार संबंधित उमेदवाराविरुध्द कारवाई करण्यात येईल. याची नोंद सर्व परीक्षार्थीनी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

राष्ट्रीय परीक्षा एजन्सी नवी दिल्ली मार्फत आयोजित नीट (युजी)-२०२६ फेर प्रवेश परीक्षा नांदेड जिल्ह्यात २१ जून २०२६ रोजी दुपारी २ ते ५.१५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. सदरील परीक्षेकरिता नांदेड जिल्ह्यात एकूण ४२ केंद्र असून त्यापैकी नांदेड शहरात २५ परीक्षा केंद्रे तसेच ग्रामीण भागात १७ परीक्षा केंद्र अशी एकूण ४२ परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आलेली आहेत. NEET UG-२०२६ प्रवेश परीक्षेसाठी पात्र उमेदवारांनी २१ जून २०२६ रोजी परीक्षा केंद्रावर सकाळी ठीक ११ वाजता रिपोर्टींग करावे. स.११ ते १.३० ही वेळ परिक्षार्थीची तपासणीची वेळ राहील. परीक्षा केंद्रावर परीक्षा कालावधीत परीक्षार्थी मार्फत कोणत्याही गैर मार्गाचा अवलंब होऊ नये. जसे की, इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा, ब्लूटूथचा वापर तसेच मनगटी डिजिटल घडयाळीचा वापर करण्याचे परीक्षार्थी यांनी कटाक्षाने टाळावे तसेच वरील बाबींना आळा घालण्यासाठी परीक्षार्थी यांची परीक्षा केंद्रावर वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत ELECTRONIC DIVICE, EAR BUD व तत्सम बाबीची तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत पडताळणी केली जाणार आहे याची सर्व परीक्षार्थ्यांनी नोंद घ्यावी. उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत नीट (युजी)-२०२६ फेर प्रवेश परीक्षा केंद्रामध्ये खालील वस्तू घेऊन जाण्याची परवानगी असणार नाही.उदा. मजकूर साहित्य, मुद्रित किँवा लिखित कागदाचे तुकडे, भूमिती पेन्सिल, बॉक्स, प्लास्टिक पाऊच, कॅल्क्युलेटर, स्केल, लेखन पॅड, पेन ड्राईव्ह, कॅल्क्युलेटर लॉग टेबल, इलेक्ट्रॉनिक पेन स्कॅनर इत्यादी कोणतीही स्टेशनरी वस्तू उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर आणू नये. NEET (UG)-२०२६ फेरप्रवेश परीक्षा केंद्रावर ड्रेस कोड संदर्भाने आयोगाने दिलेल्या निर्देशाचे तंतोतंत पालन परीक्षार्थी यांनी करावे. जसे की, वजनाने भारी असलेला पोशाख फुलबाहीचा शर्ट प्रतिबंधित असून सांस्कृतिक व पारंपारिक पोशाखास तपासणी संदर्भाने परीक्षेच्या दिवशी सकाळी ११.३० वा. च्या अगोदर परीक्षा केंद्रावरील यंत्रणेकडून तपासणी करून घ्यावी. तसेच परीक्षा केंद्रावर प्रवेश करताना परीक्षार्थी यांनी ओळख पटविण्यासाठी आपला पूर्ण चेहरा दोन्ही कानांसह दिसेल याची योग्य ती काळजी घ्यावी.परीक्षार्थी यांनी परीक्षा केंद्रावर इतर वस्तू जसे की वॉलेट, गॉगल, हॅन्डबॅग, मायक्रो कॅमेरा, असलेली कोणतीही वस्तु बेल्ट, कॅप, कोणतेही मनगटी घड्याळ, ब्रेसलेट, कॅमेरा, कोणतेही दागिने, कोणतेही खादयपदार्थ खुल्या स्वरुपातील किँवा पॅकेजडं, पाणी बॉटल (पारदर्शक पाणी बॉटल वगळून) इ. कोणत्याही लपवून आणण्याजोग्या वस्तू मायक्रोचीप, कॅमेरा, ब्लूटूथ, इ. उपकरण संप्रेषण साधने इतर कोणतीही वस्तू जी अनुचित साधनांसाठी वापरली जाऊ शकते त्या सर्व वस्तू प्रतिबंधित करण्यात आलेल्या आहेत त्याची परीक्षार्थी यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# राज्य माहिती आयोगासह गटविकास अधिकाऱ्यांच्या आदेशालाही केराची टोपली

## दिव्यांग निधी खर्चाची माहिती लपविण्याचा ग्रामपंचायतींचा कुटील डाव

किनवट/प्रतिनिधी-राज्य माहिती आयोगासह किनवट पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांच्या आदेशाला तालुक्यातील ग्रामपंचायतींनी तुर्तास तरी माहिती देण्यास ठेंगा दाखवला आहे. दिव्यांग कल्याण निधी खर्चाबाबतची माहिती अपीलकर्त्यास तात्काळ उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले होते परंतु तीन महिन्याचा काळ लोटला तरी ग्रामपंचायतींनी अपेक्षित सहकार्य केले नसल्याने अपिलार्थींनी नाराजी व्यक्त केली असून हक्कापासून वंचित ठेवल्याचा आरोप केला आहे.

पंचायत समिती किनवट अंतर्गत १३४ ग्रामपंचायती कार्यरत असून ग्रामपंचायत स्तरावर ३% आणि ५% दिव्यांग कल्याण निधी खर्चाबाबत माहिती अधिकारांतर्गत माहिती मागितली होती परंतु कसलाही प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून प्रथम अपील आणि राज्य माहिती आयोगाच्या द्वितीय अपील क्र.९१३/२०२३ मधील निर्णयाच्या अनुषंगाने गटविकास अधिकाऱ्यांनी सर्व ग्रामपंचायत अधिकारी व जनमाहिती अधिकाऱ्यांना पत्र पाठवून नियमानुसार माहिती देण्याच्या सूचना केल्या होत्या. शिवाय माहिती देण्यास कोणताही विलंब होऊ नये, अशी स्पष्ट ताकीदही आदेशात देण्यात आली होती. तथापि, संबंधित आदेशाची अंमलबजावणी झालेली नसल्याने ग्रामविकास अधिकारी आणि ग्रामविस्तार अधिकाऱ्यांनी गटविकास अधिकाऱ्यांच्या पत्रालाच केराची टोपली दाखविल्याचे चित्र दिसून येत असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.याबाबत नांदेड जिल्हा सेक्युलर दिव्यांग मुव्हमेंटचे अध्यक्ष ड.मिलिंद सर्पे यांनी सांगितले की, राज्य माहिती आयोगाच्या आदेशानंतरही माहिती देण्यात आलेली नाही. दिव्यांगांसाठी राखीव निधीचा खर्च नेमका कसा झाला, याची माहिती मिळणे हा नागरिकांचा आणि दिव्यांग बांधवांचा अधिकार आहे. माहिती न दिल्याबद्दल संबंधितांविरुद्ध राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात येणार आहे.दिव्यांग कल्याणासाठी राखीव निधीच्या खर्चातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाचा प्रश्न ऐरणीवर आला असून, आता राज्य माहिती आयोग आदेशाच्या अवमूल्यन प्रकरणात काय भूमिका घेतो याकडे दिव्यांग बांधवांसह नागरिकांचे लक्ष लागले आहे. वरिष्ठांच्या आदेशाचे अनुपालन होत नसेल तर या पेक्षा धक्कादायक अन्य काही असूच शकत नाही. दिव्यांगाचा हक्क, राज्य माहिती आयोग आणि वरिष्ठ प्रशासनाची कवडीमोल किंमत ग्रामपंचायती करूच कशा शकतात ? हा अनुत्तरीत प्रश्न आहे.

# अन्न व औषध प्रशासनाचा दणका: मुखेडमध्ये 'एक्सपायरी' माल रस्त्यावर

मुखेड/प्रतिनिधी-मुखेड शहर आणि तालुक्यात अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या अचानक तपासणी मोहिमेमुळे व्यापारी वर्गात एकच खळबळ उडाली आहे. प्रशासनाच्या कारवाईच्या भीतीने अनेक किराणा, बेकरी, कन्फेक्शनरी आणि मेडिकल स्टोर्स चालकांनी आपला 'एक्सपायरी' झालेला माल थेट रस्त्यावर फेकून दिला आहे. शहरात सध्या सर्वत्र हाच चर्चेचा विषय ठरत आहे.

एफडीएच्या अधिकाऱ्यांनी मुखेडमध्ये धडक देत वैद्यकीय साहित्य, सौंदर्य प्रसाधने, तसेच प्रतिबंधित तंबाखू व गुटख्याच्या विक्रीवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. यासोबतच दुध आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये भेसळ रोखण्यासाठी नकली पनीर आणि रसायनाचा वापर करून तयार केलेल्या दुधाची तपासणी मोहीम तीव्र करण्यात आली आहे.१७ जून रोजी औषध निरीक्षक राठोड यांनी मुखेडमध्ये तपासणीसाठी धाव घेतली. ही बातमी वाऱ्यासारखी पसरताच, दुपारनंतर शहरातील बहुतांश दुकाने अचानक बंद झाली. संध्याकाळी सात वाजेपर्यंत बाजारात शांतता पसरली होती. विशेष म्हणजे, मुखेड शहरात ४८ मेडिकल स्टोर्स आहेत, त्यापैकी अनेक दुकाने कारवाईच्या भीतीने बंद ठेवण्यात आली होती. दरम्यान प्रशासनाच्या या कठोर कारवाईमुळे सामान्यांकडून समाधान व्यक्त होत आहे. एक्सपायरी झालेला माल विक्रीसाठी ठेवल्यामुळे आरोग्याला धोका निर्माण झाला होता. आता या धाडसत्रामुळे भविष्यातही व्यापाऱ्यांवर वचक राहील आणि ग्राहकांना शुद्ध व सुरक्षित वस्तू मिळतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान मुखेड शहरात काही मेडिकल दुकानदार डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय रुग्णाना सलाईन लाऊन पैसे उकळण्याचा गोरख धंदा सुरू केला आहे. या मेडिकलची चौकशी करून यांच्यावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी करण्यात येत आहे.

# राहुल गांधी यांचा वाढदिवस विविध कार्यक्रमांनी साजरा

मुंबई/प्रतिनिधी-लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा वाढदिवस काँग्रेस पक्षाकडून विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. प्रदेश काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवन येथे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते राहुल गांधी यांच्यावरील जनमानसाची शिदोरी मासिकाच्या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष रमेश शेट्टी, सरचिटणीस अभिजित सपकाळ, गुरबिंदरसिंग बच्छेर, प्रदेश सरचिटणीस व शिदोरीचे प्रबंधक संपादक अनंत मोहोड, कार्यकारी संपादक सुनिल खांडगे आदी उपस्थित होते.

राहुल गांधींचा वाढदिवस मुंबई युवक काँग्रेसनेही उत्साहात साजरा केला, मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्ष झिनत शबरीन यांच्या नेतृत्वाखाली व मुंबई उत्तर मध्य जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष निखील रुपारेल यांच्या पुढाकाराने गिग वर्कर्स सन्मान उपक्रमांतर्गत ॲप-आधारित दुचाकी डिलिव्हरी सेवा देणाऱ्या गिग वर्कर्सना मोफत पेट्रोलचे वितरण करण्यात आले.


CHANGE IN NAME

My (old name) is **MIRZA SHABANABEGAM YOUNUSBEG** which now I am, changing as (new name) **SHABANA KHAN PATHAN GULAB KHAN**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Sign by
**SHABANA KHAN PATHAN GULAB KHAN**
P-20 Waghi Road Near Khadakpura
Samira Bag Nanded-431601
M.No.-9552266356

CHANGE IN NAME

My (old name) is **KHAN AZEEMULLAH** which now I am, changing as (new name) **AZEEMULLAH KHAN SAMADULLAH KHAN**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Sign by
**AZEEMULLAH KHAN SAMADULLAH KHAN**
R/o H.no.105,block no.17, Labour colony
Nanded-431602
M.No.-9860386195

CHANGE IN NAME

My (old name) is **ASRA KOUSER** which now I am, changing as (new name) **ASRA KOUSER AZEEMULLAH KHAN**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Sign by
**ASRA KOUSER AZEEMULLAH KHAN**
R/o H.no.105,block no.17, Labour colony
Nanded-431602
M.No.-9860986195

CHANGE IN NAME

My (old name) is **KHEDKAR SMITA** which now I am, changing as (new name) **SMITA PRAMOD KHEDKAR**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Sign by
**SMITA PRAMOD KHEDKAR**
R/o H.no.174,block no.12, Matoshri niwas
opp Boudh vihar Labour colony
Nanded-431602
M.No.-7972372248

CHANGE IN NAME

My (old name) is **KHAN MUJAHED AHAMED** which now I am, changing as (new name) **KHAN MUJAHED AHAMED MAQBOOL AHAMED KHAN**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Sign by
**KHAN MUJAHED AHAMED MAQBOOL AHAMED KHAN**
R/o H,no.1-5-672,Near Nobel school
Labour colony Nanded-431601
M.No.-9970517855


## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१९१/२०२६
(CNR No.MHND100006272026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पार्वतीबाई भ्र.सिताराम बडूरे | वय-५५ वर्षे | धंदा-घरकाम |
| २ | बालाजी पि.सिताराम बडूरे | वय-३४ वर्षे | धंदा-नोकरी |
| ३ | गोविंद पि.सिताराम बडूरे<br>रा.आंबुलगा ता.कंधार जि.नांदेड | वय-३२ वर्षे | धंदा-नोकरी |

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ३ यांचे वडिल नामे सिताराम पि.हुलबा बडूरे हे होते ते दिनांक ०५/११/२०२० रोजी अंबुलगा ता.कंधार जि.नांदेड येथे मयत झाले आहे. तसेच अर्जदार क्र.१ ची सासु व अर्जदार क्र.२ व ३ यांची आजी नामे केराबाई हुलबा बडूरे ही यापुर्वीच मयत झाली आहे. अर्जदारांचे म्हणणे आहे की सिताराम पि.हुलबा बडूरे यांचे अर्जदारा शिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत सिताराम पि.हुलबा बडूरे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत सिताराम पि.हुलबा बडूरे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख - १३/०७/२०२६

आज रोजी दि.१६/०६/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१८६/२०२६
(CNR No.MHND100006242026)

अर्जदार :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आतेका नसरीन भ्र.मिर्झा साईद बाबर बेग<br>रा.कोटबाजार ता.कंधार जि.नांदेड | वय-४८ वर्षे | धंदा-घरकाम |
| २ | नजमा तसनीम भ्र.मोहम्मद शेएबुद्दीन<br>रेल्वे स्टेशन रोड डॉक्टर लेन नांदेड ता.जि.नांदेड | वय-२७ वर्षे | धंदा-घरकाम |
| ३ | मिर्झा मुदस्सीर बेग पि.मिर्झा साईद बाबर बेग<br>रा.कोटबाजार ता.कंधार जि.नांदेड | वय-२४ वर्षे | धंदा-शिक्षण |
| ४ | बेग सा अफशीन भ्र.मोहम्मद सादिकुल अमीन<br>रा.उमर कॉलनी,देगलुर नाका नांदेड ता.जि.नांदेड | वय-२१ वर्षे | धंदा-शिक्षण |
| ५ | ऐमन फातेमा पि.मिर्झा साईद बाबर बेग<br>अ.पा.क.आई अर्जदार नं.१<br>रा.कोटबाजार ता.कंधार जि.नांदेड | वय-१५ वर्षे | धंदा-शिक्षण |

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडिल नामे मिर्झा सईद बाबर बेग मिर्झा अहेमद बेग हा होता तो दिनांक ०७/०४/२०२६ रोजी कोटबाजार ता.कंधार जि.नांदेड येथे मयत झाला आहे. तसेच अर्जदाराचे सासु व अर्जदार क्र.२ ते ५ यांची आजी नामे नजमुन्नीसा बेग मिर्झा अहेमद बेग ही यापुर्वीच मयत झाली आहे. अर्जदारांचे म्हणणे आहे की मिर्झा सईद बाबर बेग मिर्झा अहेमद बेग यांचे अर्जदारा शिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत मिर्झा सईद बाबर बेग मिर्झा अहेमद बेग यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत मिर्झा सईद बाबर बेग मिर्झा अहेमद बेग यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख - १३/०७/२०२६

आज रोजी दि.१६/०६/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कवी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक ११/०६/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार यासमीन बेगम अब्दुल करीम रा.दर्गापुरा कंधार ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांच्या यासमीन बेगम अब्दुल करीम रा. दर्गापुरा कंधार ता.कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव यासमीन बेगम अब्दुल करीम रा. दर्गापुरा कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०७/०२/१९९५ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०५/०६/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ११/०६/२०२६
स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.९०४/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१७/६/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **कोमल मल्हारी इंगोले** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **५७४/५७ चा भाग गट क्र.५७४ प्लॉट क्र.५७ चा भाग** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२५** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **सुनील पि.लक्ष्मण पत्रे** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ५६७/२०२३ दि.१८.०४.२०२३, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.५६, पश्चिमेस :- प्लॉट क्र.५७, उत्तरेस :- २० फूट रुंद रस्ता, दक्षिणेस :- सदर गटाचा भाग

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.९०७/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१७/६/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **मारोती रामजी कदम** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **१९८७/२८ गट क्र.५३९ प्लॉट क्र.२४** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **शिवराज विरप्पा एकलारे** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- दि.१६ १९९६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- सखाराम लंगडे यांचे शेत, पश्चिमेस :- १५ फूट रुंद रोड, उत्तरेस :- मारोती रामजी यांचा प्लॉट, दक्षिणेस :- प्लॉट क्र.२३

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.९०६/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१७/६/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **मारोती रामजी कदम** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **१९८७/२९ गट क्र.५३९ प्लॉट क्र.--** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **हिरामण इरबाजी लंगडे** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- दि.५.६.१९९७, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- सखाराम लंगडे यांचे शेत, पश्चिमेस :- १५ फूट रोड, उत्तरेस :- प्लॉट क्र.२५ आहे, दक्षिणेस :- खरेदीदार यांचा प्लॉट आहे.

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.९०५/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१७/६/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **१) शेख फरजाना गयासोद्दीन, २) शेख तसलिम गयासोदीन** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **६५९/४२ गट क्र.६०४ प्लॉट क्र.४२** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२५** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **शेख जुम्मन शेख गुलाब** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ९५४/२०२५ दि.१७.०४.२०२५, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- १५ फुट रस्ता, पश्चिमेस :- प्लॉट क्र.३३, उत्तरेस :- प्लॉट क्र.४३, दक्षिणेस :- सदर गटाचा भाग

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

# देळूब ग्रामपंचायत प्रशासक नियुक्ती रद्द प्रकरण; उच्च न्यायालयाकडून जि.प.मुख्याधिकाऱ्यांना नोटीस

अर्धापूर/प्रतिनिधी- तालुक्यातील देळूब ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अजेरुल्ला खान अजमत खान पठाण यांची प्रशासक म्हणून करण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्याच्या निर्णयाविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेची दखल घेत औरंगाबाद खंडपीठाने जिल्हा परिषद नांदेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नोटीस बजावली आहे.

अजेरुल्ला खान पठाण हे २०२१ मध्ये ग्रामपंचायत निवडणुकीत निवडून आले होते. त्यानंतर त्यांची सरपंचपदी निवड झाली होती. कार्यकाळात त्यांनी गावाचा कारभार सांभाळला. कार्यकाळ संपल्यानंतर राज्य शासनाच्या २० फेब्रुवारी २०२६ च्या परिपत्रकानुसार पुढील सहा महिने अथवा नवीन निवडणूक होईपर्यंत विद्यमान सरपंच व सदस्यांना प्रशासक म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार मार्च २०२६ रोजी अजेरुल्ला खान पठाण व ग्रामपंचायत सदस्यांना प्रशासक म्हणून नियुक्ती आदेश देण्यात आले होते.दरम्यान, ग्रामपंचायत निवडणुकीपूर्वी राजकीय वैमनस्यातून सरपंचांविरुद्ध प्रतिबंधात्मक स्वरूपाची चॅप्टर केस दाखल करण्यात आली होती. या प्रकरणाची माहिती संबंधित पोलीस निरीक्षकांनी जिल्हा परिषद प्रशासनाला देत प्रशासक नियुक्ती रद्द करण्याची विनंती केली होती. त्यानंतर जिल्हा परिषद प्रशासनाने संबंधित सरपंच व सदस्यांना कोणतीही नोटीस अथवा सुनावणीची संधी न देता त्यांची नियुक्ती रद्द करून त्या ठिकाणी प्रशासकीय अधिकाऱ्याची नियुक्ती केली.या निर्णयाविरोधात अजेरुल्ला खान पठाण यांनी ॲड. अविनाश सूर्यवंशी कावळगावकर यांच्यामार्फत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली. याचिकेत सरपंचांविरुद्धचे प्रकरण न्यायप्रविष्ट असून इतर सदस्यांविरुद्ध कोणतेही कारण नसताना संपूर्ण प्रशासक मंडळ बरखास्त करणे अन्यायकारक असल्याचा मुद्दा मांडण्यात आला. न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर यांच्या समोर सुनावणी झाल्यानंतर न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेत जिल्हा परिषद नांदेडच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना नोटीस बजावली आहे. याचिका-कर्त्यांच्या वतीने ॲड. अविनाश सूर्यवंशी कावळगावकर हे काम पाहत आहेत.

# आदमपूर येथे दिवस-रात्र अवैध मुरूम उत्खनन; नाममात्र रॉयल्टीवर मोठ्या प्रमाणात उपसा

नायगाव/प्रतिनिधी- रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आदमपूर (ता. बिलोली) येथे मोठ्या प्रमाणावर अवैध मुरूम उत्खनन सुरू असल्याचे प्रत्यक्ष पाहणीत निदर्शनास आले आहे. मोठ्या पोकलेन मशीनच्या साहाय्याने उत्खनन करून दररोज सुमारे १५ ते २० हायवा व टिपरद्वारे मुरूमाची वाहतूक दिवस-रात्र सुरू असल्याचे आढळून आले. या संपूर्ण प्रकाराचे फोटो व व्हिडिओ चित्रीकरणही करण्यात आले आहे.

प्रत्यक्ष पाहणीत अनेक हायवा व टिपर वाहनांवर नोंदणी क्रमांक (नंबर प्लेट) नसल्याचे किंवा क्रमांक स्पष्टपणे दिसत नसल्याचेही आढळून आले. त्यामुळे वाहतूक नियमांचेही सर्रास उल्लंघन होत असल्याचे दिसून येत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, नाममात्र रॉयल्टीच्या आधारे मोठ्या प्रमाणात मुरूमाचे उत्खनन व वाहतूक सुरू असून शासनाच्या महसुलाचे मोठे नुकसान होत आहे. अवैध उत्खननामुळे पर्यावरणाचा समतोलही बिघडत असून परिसरातील नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.एवढ्या मोठ्या प्रमाणावर अवैध उत्खनन व वाहतूक सुरू असतानाही संबंधित यंत्रणेकडून प्रभावी कारवाई होत नसल्याबद्दल नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन रामतीर्थ पोलीस ठाणे व महसूल विभागाने संयुक्तपणे तपास करावा, उत्खननाची व रॉयल्टीची पडताळणी करावी, नंबर प्लेट नसलेल्या वाहनांवर कारवाई करावी तसेच अवैध उत्खनन व मुरूम वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करून हा प्रकार तात्काळ बंद करावा, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

## पीपल्स कॉलेजमध्ये संस्था पदाधिकाऱ्यांशी सहविचार

# डॉ.विशाल पतंगे यांची शैक्षणिक उपप्राचार्यपदी नियुक्ती

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड एज्युकेशन सोसायटी संचलित पीपल्स कॉलेजमध्ये संस्था पदाधिकाऱ्यांशी संवाद व सहविचार कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शैक्षणिक धोरणे, महाविद्यालयाचा सर्वांगीण विकास आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील होते. यावेळी उपाध्यक्ष ॲड. प्रफुल्लजी अग्रवाल, सचिव सौ. श्यामल दीपनाथ पत्की, सहसचिव ॲड. प्रदीप नागापूरकर, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष दत्ता भगत, प्राचार्य डॉ. विकास सुकाळे, कार्यकारिणी सदस्य तथा मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. यशपाल भिंगे, प्रा. विलास वडजे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी संस्थेच्या शैक्षणिक धोरणांबाबत मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांवर भर दिला. प्राध्यापकांनीही विविध शैक्षणिक व प्रशासकीय विषयांवर आपली मते मांडत संस्थेच्या प्रगतीसाठी उपयुक्त सूचना मांडल्या. संवादात्मक वातावरणात झालेल्या या सहविचार कार्यक्रमामुळे संस्था व महाविद्यालय यांच्यातील समन्वय अधिक बळकट झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. दरम्यान, राज्यशास्त्र विभागातील प्रा. डॉ. विशाल पतंगे यांची शैक्षणिक उपप्राचार्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. संस्थेच्या सचिव सौ. श्यामल दीपनाथ पत्की यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी डॉ. पतंगे यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झालेल्या या कार्यक्रमामुळे संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीला नवी दिशा मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# चार महिन्यापासून श्रावण बाळ योजनेचे अनुदान रखडले

देगलूर/प्रतिनिधी-शासनाच्या श्रावण बाळ योजनेचे अनुदान गेल्या चार महिन्यापासून रखडल्याने देगलूर तालुक्यातील हाणेगाव, मरखेल, करडखेड, शहापूर, खानापूर, माळेगाव, मानूर, लोणी, आधी गावातील शकडो जेष्ठ नागरिक अक्षरश: आर्थिक विवेचनेत सापडले आहेत. हाताला काम नाही, उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही, आणि त्यातच मिळणारे मासिक अनुदानही बंद झाल्याने अनेक वृद्धावर उपासमारीची वेळ आली आहे.

या गंभीर परिस्थितीमुळे संतप्त झालेल्या ज्येष्ठ नागरिकांनी जिल्हाधिकारी यांनी तातडीने याकडे लक्ष देऊन निराधार व श्रावणबाळ योजनेचे रखडलेले अनुदान त्वरित वाटप करण्याची मागणी होत आहे. श्रावण बाळ योजनेचे अनुदान वयोवृद्ध निराधारासाठी जगण्याचा एकमेव आधार आहे. मात्र गेल्या चार महिन्यापासून अनुदान खात्यावर जमा झाले नसल्याने त्यांच्या दैनंदिन गरजावर परिणाम झाला आहे. घर खर्च, औषधोपचार, अन्न धान्य खरेदी यासाठी आवश्यक ती रक्कम मिळत नसल्याने वृद्ध निराधारांना हाल अपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. देगलूर शहर व परिसरातील अनेक ज्येष्ठ नागरिक विविध आजाराने त्रस्त असून नियमित उपचार करणे त्यांच्यासाठी अत्यावश्यक आहे. मात्र अनुदान बंद झाल्याने औषधी खरेदी करण्यासाठीही त्यांच्याकडे पैसे नसल्याचे विदारक परिस्थिती निर्माण झाली आहे. शासनाच्या योजनांचा गाजावाजा केला जात असताना प्रत्यक्ष लाभार्थ्यांना मात्र आपल्या हक्काच्या पैशासाठी कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत असल्याने निराधारामध्ये नाराजी व्यक्त होत आहे. आम्ही आयुष्यभर कष्ट केले आता वृद्धापकाळात शासनाच्या मदतीवर जगत आहोत. पण तेच अनुदान वेळेवर मिळत नसेल तर जगायचे कसे? असा संतप्त सवाल ज्येष्ठ नागरिकांनी उपस्थित केला आहे. शासनाने तातडीने निधी उपलब्ध करून थकीत अनुदान वितरित करावे अन्यथा तीव्र आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही देण्यात आला आहे. आता नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी या बाबीकडे त्वरित हस्तक्षेप करून निराधार नागरिकांना लवकरात लवकर अनुदानाचे वाटप करावे, अशी मागणी वयोवृद्ध श्रावण बाळ व निराधार, अपंग वयोवृद्ध नागरिकांनी केली आहे.

## जाहीर प्रगटन

तहसिलदार उमरी तथा तालुका दंडाधिकारी उमरी यांचे न्यायालयात
इ.कि.फौ.अर्ज.क्र./२०२५

श्री/श्रीमती **जितेंद्र रामराव आडे**
विरुध्द
ग्राम पंचायत अधिकारी,ग्रामपंचायत कार्यालय **फुलसींगनगर** ता.उमरी जि.नांदेड.

प्रकरण - जन्म नोंद घेणे बाबत.

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार नामे **जितेंद्र रामराव आडे** रा.**फुलसींगनगर** ता.उमरी जि.नांदेड यांनी कार्यालयात हजर राहुन जन्म/मृत्यू नोंदणी कायदा २०२३ व सुधारीत शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ अन्वये दिनांक ०८/०५/२०२६ रोजी नोंद घेण्यासाठी इ.कि.फौ. अर्ज दि. / / रोजी दाखल केला आहे.

अर्जदार यांची मुलगी नामे **विदेश्वर जितेंद्र आडे** यांचा जन्म दिनांक १२/११/२०१४ रोजी झाल्याची नोंद मौ **फुलसींगनगर** ता.उमरी जि.नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधीतास कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांच्या जन्माची/मृत्युची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी लेखी आक्षेप या कार्यालयास सदर जाहीर प्रगटनापासून १५ दिवसाच्या आत सादर करावा, नंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेपाचा विचार केल्या जाणार नाही १५ दिवसात आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

दिनांक-१८/०६/२०२६
स्थळ-उमरी

स्वाक्षरित/-
तहसिलदार उमरी

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.९०८/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१७/६/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **१) रमेश रामा कांबळे, २) अशोक रामा कांबळे, ३) जळबा रामा कांबळे, ४) संभाजी रामा कांबळे, ५) सखुबाई चांदु वाघमारे, ६) कांताबाई नामदेव नवघरे** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **४१/१ गट क्र.-- प्लॉट क्र.--** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **मयत नामे रामा जळबा कांबळे** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- मा.न्यायालयाचे वारसा प्रमाण पत्र, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- कांबळे यांचे घर, पश्चिमेस :- सटवाजी कांबळे यांचे घर, उत्तरेस :- मिलिंद खंडू कांबळे यांचे घर, दक्षिणेस :- रस्ता

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

# सर्वधर्मसमभावाचे प्रतीक ठरलेला विडूळचा पारंपारिक मोहरम उत्सव सुरु

उमरखेड/प्रतिनिधी-उमरखेड तालुक्यातील विडूळ येथे सर्वधर्मसमभाव आणि पारंपारिकतेची ओळख जपणाऱ्या मोहरम उत्सवास उत्साहात प्रारंभ झाला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही उत्सवानिमित्त श्री नाल साहेब, ताज (तांबारी) सवारी तसेच ताजियाची स्थापना १७ जून रोजी करण्यात आली.

यापूर्वी १६ जून रोजी परंपरेनुसार भूमिपूजनाचा विधी पार पडला. मोहरमच्या सात, नऊ आणि दहा तारखेला परंपरेनुसार श्री नाल साहेब व ताजियाची ग्रामफेरी काढण्यात येणार असून, दहाव्या दिवशी धार्मिक विधीनंतर ताजियाचे विसर्जन करण्यात येणार आहे.विडूळ गावातील हा मोहरम उत्सव अनेक वर्षांपासून हिंदू-मुस्लीम ऐक्य आणि सामाजिक सलोख्याचे प्रतीक म्हणून ओळखला जातो. उत्सवादरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांसह भाविकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती असते.सदर उत्सवात सर्व धर्मीय भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन श्री नाल साहेब देवस्थानचे संस्थापकीय अध्यक्ष तथा पुजारी जयराम



शंकरराव डांगे गुरव यांनी केले आहे. गावातील नागरिकांच्या सहकार्याने पारंपारिक पद्धतीने हा उत्सव साजरा करण्यात येत असून, उत्सवाबाबत ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

## टी.सी.हरवली आहे

माझी जायेभाये ब्रह्माजी साईनाथ या नावाची सहावी पासची उत्तीर्ण झालेली माझी मूळ टी.सी. व इतर शैक्षणिक कागदपत्रे कुरुळा ते कंधार या मार्गावर प्रवासादरम्यान कंधार बसस्थानक परिसरात हरवली आहे. कोणास सापडले असल्यास खालील पत्यावर संपर्क करावा.

संपर्क पत्ता
**जायेभाये ब्रह्माजी साईनाथ**
मु.हिप्परगा ता.कंधार जि.नांदेड
मो.८३२९५०९२२७

## CHANGE IN NAME

My (old name) is **KHEDKAR PRAMOD** which now I am, changing as (new name) **PRAMOD MURLIDHARRAO KHEDKAR**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**PRAMOD MURLIDHARRAO KHEDKAR**
R/o H.no.174,block no.12, Matoshri niwas
near Boudh vihar Lebour colony
Nanded-431602
M.No.-9422174999

## तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कवी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक १३/०५/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार शेख फकरोदीन हबीबसाब रा.संभाजीनगर कंधार ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांच्या शेख हबीब शेख इस्माईल रा.संभाजीनगर कंधार ता.कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव शेख हबीब शेख इस्माईल रा. संभाजीनगर कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०७/१०/२००५ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०५/०५/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- १३/०५/२०२६
स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

## तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कवी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक ११/०६/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार ताई मच्छिंद्र पांडलवाड रा.कुरुळा ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांच्या ताई मच्छिंद्र पांडलवाड रा.कुरुळा ता.कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव ताई मच्छिंद्र पांडलवाड रा. कुरुळा ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०३/०३/१९९९ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०६/०६/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ११/०६/२०२६
स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

# श्री गुरु हरगोविंद साहिब महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

नांदेड/प्रतिनिधी-शिख धर्माचे सहावे धर्मगुरू श्री हरगोविंद साहिबजी यांच्या ४३१ व्या जयंती निमित्त दि.२५ जून ते ३० जून दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री गुरू ग्रंथ साहिबजी, श्रीदसम ग्रंथ साहिब जी, श्री सरबलोह ग्रंथ साहिबजी श्री चौपई साहिबचे पाठ होणार आहे. नगरकिर्तनाने कार्यक्रमांचा समारोप होणार आहे, अशी माहिती हजुरी साथ संगत व हजुरी क्रांती सघटनांचे अध्यक्ष मनप्रीत सिंघ कुंज्रीवाले यांनी दिली आहे.

गुरुद्वाराचे मुख्य जत्थेदार संत बाबा कुलवंत सिंघजी, समुह पंजप्यारे साहिब यांच्या आशीर्वादाने व बाबा नरिदंरसिंघजी व बाबा बलविंदर सिंघ लंगर साहिब (कारसेवावाले) व माता साहिब देवाजीचे जत्थेदार बाबा तेजासिंघ यांच्या संयुक्त विद्यमाने गुरू हरगोविंद साहिब यांच्या जंयतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. सहावे गुरु हरगोविंद साहिबजी यांची जयंती २४ जून रोजी साजरी करण्यात येत आहे. त्या निमित्ताने फतेह सिंघजी मंगल कार्यालय अबचल नगर कॉलनी येथे सात दिवस दर रोज कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.दुपारी ३.३० ते ५ वाजेपर्यंत सुखमनी साहिबचा पठण आणि रात्री ८ ते ९ वाजेपर्यंत श्री गुरु हरगोबिंद साहिब यांचे जीवनचरित्र, कथाकार, ज्ञानी सरबजीत सिंग निर्मले आणि ज्ञानी नाहर सिंघ हे सादर करणार आहेत. दररोज कथेच्या नंतर सायंकाळी ९ ते ९.३० पर्यंत नाम सिमरणचे पाठ होणार असून त्यानंतर लंगर प्रसादाचे आयोजन केले आहे. दि. २५ जून व २६ जून रोजी सकाळी ११ वाजता गतका प्रतियोगिता व दि.२७ जून ते २८ जूनपर्यंत चेस प्रतियोगिताचे आयोजन करण्यात आले आहे.दि.३० जून रोजी सप्ताह पाठच्या समाप्ती होईल. या कार्यक्रमांना सर्व साथ संगतने मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून कार्यक्रम व लंगर प्रसादाचा लाभघेऊन महाराजांचे आशिवार्द प्राप्त करावेत, असे आवाहन हजुरी क्रांती संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

पान १ वरुन

## दगाफटक्याचे राजकारण...

कारणे दिली तरी सत्य एकच आहे. महाराष्ट्र हे घाणेरडे राजकारण सहन करणार नाही. या काळोखात प्रकाश देणारी फक्त आणि फक्त आपली मशाल आहे, असे आदित्य ठाकरे यांनी म्हटले. दरम्यान, ओमराजे निंबाळकर यांनी पक्षांतराबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना भावनिकदृष्ट्या पक्ष सोडण्याचा निर्णय चुकीचा वाटत असला, तरी राजकीयदृष्ट्या तो योग्य असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे शिवसेना (ठाकरे गट)तील खासदारांच्या फुटीवरून राजकीय आरोप-प्रत्यारोप अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

## मराठा आरक्षणासाठी...

लिपीतील कागदपत्रांच्या पडताळणीमध्ये तहसीलदार आणि जिल्हाधिकारी अडथळे निर्माण करीत असल्याचा आरोपही त्यांनी केला.महसूल विभागाकडील पोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या जुन्या कुणबी नोंदी नष्ट केल्या जात असल्याचा गंभीर आरोप करत त्यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. ओबीसी आरक्षणाला धक्का देण्याचा आमचा कोणताही हेतू नसून वैध कागदपत्रांच्या आधारे हक्क मिळवून देण्याचीच आमची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४